



दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Title Code- MAHMAR-51647



संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com



वर्ष २ रे    अंक : ६८८. वा    सोमवार    दि. १९ फेब्रुवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# राज्यात कायद्याचं राज्य,कोणावर अन्याय होणार नाही, अजित पवारांचे वक्तव्य



**वृत्तसंस्था/मुंबई**

नवी मुंबईमध्ये अल्पसंख्याक विश्वास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील यांनी स्पष्ट भाषेत वक्तव्य केले होते की, अजित पवार नेहमी घातच करतात. ह्या वक्तव्यावर अजित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधत असताना सांगितले की, नवीन जनरेशन आहे. काही बोलली असली तरी त्याला उत्तर देण्याचे काही कारण नाही. तसेच सध्या अनेक नवीन तरुण राजकारणात आलेले आहेत. त्यासंदर्भात देवेंद्र फडणवीस हर्षवर्धन पाटील चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत चर्चा करू. तसेच बारामतीमध्ये पाटील पवार कलगितुरा पाहायला मिळणार असल्याचे विचारताच अजित पवार म्हणाले की, मला असं वाटत नाही, असे वक्तव्य करत बोलणं टाळलं.अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्र सर्वधर्म समभाव पाळणारं राज्य आहे. अल्पसंख्याक समाजाने कायम विश्वास दाखवला आहे. मुस्लिम समाजामध्ये भय दाखवून समाजाला अस्वस्थ करू पाहत आहेत. मात्र प्रदेशातील सर्व नागरिकांची जबाबदारी आमची आहे. राज्यात कायद्याचं राज्य असेल आणि कोणावर अन्याय होणार नाही, असं अजित पवार यावेळी म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक विभागाच्या वतीने वाशी इथल्या सिडको प्रदर्शनी केंद्रात राज्यस्तरीय अल्पसंख्याक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.आजच्या अल्पसंख्याक मेळाव्यात मंजूर झालेल्या ठरावावर बारकाईने लक्ष देणार असल्याचं आश्वासन ही अजित पवार यांनी दिलं. आमच्या पक्षात जास्तीत जास्त जिल्ह्यात अध्यक्ष अल्पसंख्याक समाजातील आहेत. हा महत्वाचा विभाग आहे. त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणार आहे. या समाजातील मुलींना शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहोत. वक्फ बोर्डाच्या अडचणी सोडविण्यासाठी सूचना दिल्या आहेत. मागील वर्षी ५०० करोड दिले आहेत. या वर्षी जास्तीत जास्त मदत देण्यात प्रयत्न केला जाणार आहे. उर्दू हाऊस देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यावेळी म्हणाले.ते पुढे म्हणाले की, जे बोलतो ते करतो. सर्वांना सोबत घेऊन चाललो आहोत. राज्यात कायद्याचं राज्य असेल आणि कोणावर अन्याय होणार नाही, असंही अजित पवार यावेळी म्हणाले. ८ लाख रुपयांचे उत्पन्न असलेल्या मुलींच्या शिक्षणाचा खर्च राज्य सरकार करणार आहे. या योजनेमध्ये अल्पसंख्याक समाजातील मुलींचाही समावेश असणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.




# इन्स्टाग्रामवरील ओळख पडली महागात

## शारिरीक संबंधामुळे अल्पवयीन मुलगी गरोदर आरोपीवर बलात्काराचा गुन्हा दाखल...

वृत्तसंस्था/नागपूर



अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करून तिला गर्भवती करणाऱ्या युवकाला पारडी पोलिसांनी अटक केली. शिवम शेषराम मेहरा (वय १९, रा. एकतानगर, भांडेवाडी) असे अटकेतील युवकाचे नाव आहे. ही १५वर्षीय मुलगी दहाव्या वर्गात शिकते. शिवम हा फर्निचरचे काम करतो. ऑक्टोबर २०२३मध्ये शिवमची पारडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या मुलीची इन्स्टाग्रामवर ओळख झाली. दोघांत प्रेमसंबंध निर्माण झाले. लग्नाच्या आणाभाका झाला. दोघांत शारीरिक संबंध प्रस्थापित झाले.दरम्यान, मुलीची प्रकृती खालावली. नातेवाइकांनी तिला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. ती गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. नातेवाइकांना धक्का बसला. नातेवाइकांनी चौकशी केली. शिवमसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे तिने नातेवाइकांना सांगितले. मुलीच्या एका नातेवाइकाने पारडी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून शिवमला अटक केली. पोलिसांनी शनिवारी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची २१ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली.

# २८ वर्षीय तरुणाने केली आत्महत्या

जनसंचलन/ सिंदखेडराजा



शिंदी सिंदखेडराजा तालुक्यातील मौजे शिंदी येथील तरुण प्रितेश समाधान बेलोडे वय २८ या अविवाहित तरुणाने १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी १० वाजेच्या सुमारास आपल्या राहत्या दहा बाय दहा च्या घरात आत्महत्या केली यावेळी कामावरून आलेल्या अक्षय नावाच्या भावाने सदरची घटना लक्षात येताच आजूबाजूच्या लोकांना आरडाओरड करून सांगितले असता फोन द्वारे सरपंच पती अशोक खरात यांना माहिती दिली. यावरून त्यांनी साखरखेर्डा पोलीस स्टेशन येथे संपर्क साधून पोलीस हेडकॉन्स्टेबल नितीन राजे जाधव सदर घटनेची माहिती दिली त्यावरून त्यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन पंचासमक्ष प्रेतास खाली उतरून चौकशी केली असता मृतकाचे वडील हे २५ वर्षापूर्वी मृत पावलेले असून आई ही अंगणवाडी मदतनीस असून संभाजीनगर येथे नातेवाईकाकडे ती गेली होती मृतकाचा भाऊ अक्षय समाधान बेलोडे याने सांगितले की माझी आई अंगणवाडी मदतनीस असुन आम्हा दोघा भावंडासाठी दोन लाख रुपये कर्ज हे विविध फायनान्स चे काढले असुन त्याच्या नैराश्यतुन आत्महत्या केली असावी अशी प्राथमिक माहिती पोलिसांना दिली यावेळी बिट जमादार नितीन राजे जाधव व रामदास वैराळ, विनोद वैद्य हे ठाणेदार स्वप्नील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करित आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज हे मिरवायचा विषय नसून रूजवायचा विषय आहे - प्रा. रामचंद्र पाटील.

जनसंचलन/चिखली



तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे राष्ट्रमाता मॉ साहेब जिजाऊंच्या माहेरघरातील आपण मावळे आहे. या जिल्ह्यात ३६ स्मारक असून आपण भाग्यवान आहात तीनवर्षे छत्रपती शिवाजी महाराज या भूमित बागडले आहे त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज मिरवायचा विषय नसून रूजवायचा विषय असल्याचे मत शिवश्री प्रा रामचंद्र पाटील यांनी व्यक्त केले. ते दि १७ फेब्रुवारी रोजी मेरा बु. येथे शिवजयंती निमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंढेरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विकास पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ, राणा मंगलसिंग राजपूत हे होते प्रारंभी आपल्या प्रास्ताविकात गजानन वायाळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा विषद केली आपल्या ओघवत्या भाषणात प्रा रामचंद्र पाटील पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज दिसण्यात महत्वाचे नाही तर असण्याला महत्व आहे छत्रपतींचा ट्याट्यू हातावर लाऊन बिअर हातात घेणे ही घोर विटंबना आजचे युवक करीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज परिश्रमातून होता येते, छत्रपती समजून घेता आले असते, मायबाप होणं सोपं आहे पालक होणं अवघड आहे, दगडात मूर्ती तयार करण्याचं कौशल्य शिल्पकारात असत. शिवाजी महाराज समजून घ्यायचे असतील तर निर्व्यसनी राहावे लागते त्यामुळे कुटूंब हरवत चालल्या मुळे शिवचरित्र सांगणे गरजेचे आहे संतती संपत्ती जमा करण्यापेक्षा संपत्ती साठी संतती जमा करणे गरजेचे आहे. महापुरुषांना कधीही हार होऊ नये म्हणून हार घालायचे असतात भरकटत चाललेल्या पिढीमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी महापुरुषांच्या विचारांची लस देण्यासाठी आलो असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की, बहुजण वाळूच्या ढिगाऱ्यासारखे आहोत, भारताला स्वातंत्र मिळालं पण सुराज्य मिळाल्याचे दिसून येत नाही महापुरुषांना रक्ताचे वारसदार नसतात स्वतः मध्ये परिवर्तन करण्यासाठी जयंती साजरी करायची असते छत्रपतींना देव माणू नका देव मानल्यास अंधभक्ती सुरू होईल जे स्वतः ला सामर्थ्यवान समजतात अशांना घाबरायचं नाही असा आदर्श जिजाऊंनी पेरल्या मुळे स्वराज्य निर्माण होऊ शकलं खोपडीतला दुष्काळ अवघड असतो. देश आणि राष्ट्र यात फरक आहे जोवर देशप्रेमाचा भावना निर्माण होणार नाही तोवर गुलामी संपणार नाही चप्पल बुट वातानुकूलित दुकानात विकले जातात तर आम्ही दररोज खात असलेला भाजीपाला धुळीमध्ये विकला जातो हे दुर्दैव आहे. त्यामुळे छत्रपतींच्या विचाराची आज गरज असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय खेडेकर यांनी तर आभार प्रदर्शन माजी सरपंच तथा शिवसेना नेते राजू पाटील यांनी मानले.

# १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा त्या नराधमाने केला विनयभंग

जनसंचलन/ देऊळगाव राजा



एक अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध १७ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे. यप्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. एक १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी, किराणा दुकानात किराणा सामान आणण्यासाठी १७ फेब्रुवारीच्या दुपारी गेले होते. यावेळी तेथे उपस्थित असलेला आरोपी अजहर अकबर खान याने मुलीचा विनयभंग केला. मुलीच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिली.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, बधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वाहतूक नियंत्रकावर कारवाईची मागणी

जनसंचलन/चिखली

आगारातील वाहतूक नियंत्रक यांनी प्रवाशांना असभ्य वागणूक दिली या बाबत चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी नारायण नरसिंग हेलगे यांनी १४ फेब्रुवारी रोजी आगार प्रमुख महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. निवेदनात नमूद केले की, १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास उदयनगर येथील प्रवासी गोपाल शिवनारायण जगताप, नारायण नरसिंग हेलगे हरणी, संजय जनार्दन बिडवे व उदयनगर परिसरातील ३५ ते ४० प्रवासी संभाजीनगर ते अकोला बस क्रमांक एम.एच.०६ - ४३१६ शिवशाही बस चिखली आगारामध्ये थांबली असता. सदर प्रवासी बसमध्ये बसले असता. सदर गाडीचे वाहक यांनी उदयनगर येथील थांबा नसल्याचे सांगून प्रवाशांना गाडीच्या खाली उतरून दिले. त्यावेळी सदर बसमध्ये फक्त ५ प्रवासी बसलेले होते. त्या वाहकाची तक्रार घेऊन प्रवासी चिखली आगारातील चौकशी कक्ष येथे गेले असता चौकशी कक्षामध्ये डुकरे व सोनाळकर उपस्थित होते. त्यांना सदर बसला उदयनगर येथे थांबा देण्याबाबत विनंती केली असता त्यांनी आम्हा प्रवाशांशी असभ्य भाषेत बोलून वाईट वागणूक दिली व आमची कोठेही तक्रार करा आमचे कोणीच काही वाकडे करू शकत नाही. असे बोलून प्रवाशांना हाकलून देत वयोवृद्ध प्रवाशांना वाईट वागणूक दिली. तरी सदर बाबतीत आपण चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली असून निवेदनावर नारायण नरसिंग हेलगे हरणी यांची स्वाक्षरी आहे.

# किल्ले बनवा स्पर्धेतून इतिसाहाची मिळाली उजळणी...

जनसंचलन/बुलढाणा

येथील तोमाई मॉन्टेसरी इंग्लिश स्कूलच्या वतीने शिवजयंतीच्या पर्वावर विद्यार्थ्यांसाठी किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मॉन्टेसरीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या मदतीने सुंदर किल्ल्यांची निर्मिती मॉन्टेसरी स्कूलच्या आवारात केली होती. या स्पर्धेत शिवकालीन किल्ल्यांची प्रतिकृती साकारण्याचा प्रयत्न विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी केला होता. या स्पर्धेत अरित्री व अस्मि नलावडे यांच्या सोबत त्यांची आई डॉ. स्नेहा नलावडे यांनी साकारलेल्या किल्ल्याला प्रथम क्रमांक तर श्रीनिका राहुल बाहेकर हिच्यासोबत तिची आई डॉ. प्रीती बाहेकर यांना द्वितीय तर अयांश योगेश शेवाळे याच्या सोबत त्याच्या आई डॉ. अश्विनी शेवाळे यांनी साकारलेल्या किल्ल्याच्या प्रतिकृतीला तृतीय क्रमांक मिळाला. या



सर्व विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांना तोमाईचे संचालक ललित चोपडा यांनी स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. या स्पर्धेचे परीक्षण सुरेश दिशागज व रविकांत तायडे यांनी केले.

# बुलडाण्यात विविध देशांमधील भिक्खूंच्या उपस्थितीत १० मार्चला जागतिक धम्म परिषद

जनसंचलन/बुलढाणा



येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात १० मार्च २०२४ रोजी जागतिक धम्म परिषद व बिझनेस एक्स्पो पार पडणार आहे. धम्म परिषदेला विविध देशातील भिक्खू संघ संबोधित करणार आहेत. या सोबतच सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने बिझनेस एक्स्पोचेदेखील आयोजन करण्यात आले आहे. धम्म परिषदेच्या आनंदी पर्वावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना मूकनायक बुलडाणा हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात ही परिषद व बिझनेस एक्स्पो घेण्यात येत आहे. यामध्ये भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, मूकनायक फाउंडेशन व महार रेजिमेंट यांचा विशेष सहभाग राहणार आहे. बिझनेस एक्स्पोसाठी जिल्हा खादी ग्रामद्योग, जिल्हा उद्योग केंद्र, विविध राष्ट्रीयीकृत बँका, पतसंस्था तसेच विविध बचत गटांनादेखील आमंत्रित करण्यात आले आहे. जिल्ह्यासह राज्यभरातून अनेक उद्योजक या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. बुलडाण्यात होणारी जागतिक धम्म परिषद ऐतिहासिक करण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. ही परिषद अविस्मरणीय राहावी, याकरिता जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभावंतांना मूकनायक बुलढाणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. विविध देशांमधील नामवंत भिक्खूंच्या साक्षीने पार पडणाऱ्या धम्म परिषदेला तमाम धम्मबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



# गुंगीचे औषध देऊन विवाहितेवर केला लैंगिक अत्याचार...

**जनसंचलन/शेगाव**



शेगाव येथील भारतीय जनता पक्षाच्या माजी कार्यकर्त्याने पक्षात मोठे पद मिळवून देण्याचे आमिष दाखवून अमरावती जिल्ह्यातील एका गावातील ३८ वर्षीय विवाहितेशी फेसबुकवर मैत्री केली. त्यानंतर तिला शेगाव येथील त्याचे घरी बोलावून गुंगीचे औषध पाजून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना १७ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली आहे. याबाबत पीडित महिलेने १७ फेब्रुवारी रोजी शेगाव शहर पोस्टेला दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की, आशिष सत्यनारायण व्यास वय ३७ रा. स्वामी विवेकानंद चौक शेगाव याची फेसबुक या सोशल मीडियावर माझी मैत्री झाली. आशिष व्यास याने आपण राजकीय पक्षात मोठ्या पदावर असल्याचे भासवून मला मोठ्या पदावर नियुक्ति मिळवून देण्याचे आमिष दाखवून मैत्री घट्ट केली. तसेच आई आजारी असल्याचे सांगून मला १ फेब्रुवारी रोजी त्याचे घरी बोलाविले आणि स्वामी विवेकानंद चौक स्थित घरी नेवून शरबत पाजले. सदर शरबतमध्ये गुंगीचे औषध टाकून बेशुध्द केले. की व अत्याचार केला. तसेच नग्न छायाचित्र काढून मला सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची मला धमकी दिली. आरोपीने एवढ्यावरच न थांबता.१ फेब्रुवारी २३ ते १२ डिसेंबबर २०२३ दरम्यान मला वेळोवेळी शेगाव येथे बोलावून तिच्यावर अत्याचार केला. सदर तक्रारवरून पोलिसांनी आरोपी आशिष सत्यनारायण व्यास याचेविरूध्द कलम ३७६ (२), (न), ३२८, ५०४, ५०६ भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. वृत्त लिहिपर्यंत आरोपीस अटक केली नव्हती. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि आयरे हे करीत आहे. पुढील तपास शेगाव शहर पोलिस करत

# देवधाबा येथे मारहाण प्रकरणी १५ जणांवर गुन्हे दाखल...

**जनसंचलन/मलकापूर**



मलकापूर गावांमध्ये गायीचे मटन का विकतो ? गाय कोठे कापली ? याकारणावरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केल्याच्या तक्रारीवरून देवधाबा येथील १५ लोकांविरूध्द विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शेख रहेमान शेख कादर (वय २३ वर्षे) रिक्षा चालक, रा. अहेमद शाहपुरा, पारपेठ, मलकापूर यांनी ग्रामीण पो.स्टे.ला दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मलकापूर पारपेठ येथे राहणारे नातेवाईक शेख मुजम्मील शेख गफ्फार, माझे वडील शेख कादर शेख इस्माईल, शेख गफ्फार शेख सत्तार यांना तेथील १० ते १५ लोक लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत होते. शेख मुजम्मील शेख गफ्फार यांना काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, गावांमध्ये मटन विक्री करीत असतांना तेथे भास्कर शिवाजी बोरसे, स्वप्नील एकनाथ कवळे, मयुर पाडुरंग कवळे, धिरज अशोक महाजन, गोलु पाचपोळ, विनायक पुडलीक बोरसे व इतर १० ते १५ लोक तेथे आले व त्यांनी मारहाण केली. तसेच दरम्यान माझी ऑटो रिक्शा क्र. एमएमच १९ बीयु ३०११ ची तोडफोड करुन १५ हजार रुपयाचे नुकसान केले. तसेच मोटर साइकल क्र. एमएच ३० एएच ३८३५ व मोटार सायकल क्र. एमएच ०३ एएल ९७५९ ची तोडफोड करून १० हजार रूपयांचे नुकसान केले. अशा तक्रारीवरून उपरोक्त व्यक्तींविरूध्द पोलिसांनी अप.नं.४८/२०२४ कलम १४३, १४७, १४९, ३२३, ३२४, ५०४, ५०६, ४२७ नुसार गुन्हा दाखल केला आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958